तरुण भारत
सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, १४ मे २०२५

आतील पानावर

पान २– मी इंडस्ट्रीच्या बाहेरची पण...
पान ३– अमिषाला जाणवतेय जोडीदाराची कमतरता
पान ४– अनुपमासोबत झळकणार समांथा
पान ५– प्रार्थना बेहेरे नवऱ्यासह करणार सिनेमा
पान ६– मांडलेकर दिग्दर्शित करणार हिंदी सिनेमा

# विकी कौशलच्या नव्या सिनेमाची चर्चा



छत्रपती विकी कौशल बॉलिवूडमधील एक उत्कृष्ट अभिनेत्यांपैकी एक आहे. मुंबईतील एका छोट्याशा चाळीत वाढलेला विकीचा अभिनय थेट प्रेक्षकांच्या हृदयाला जाऊन भिडतो. अलिकडेच त्याच्या 'छावा' चित्रपटानं जगभरात धुमाकूळ घातला. 'छावा'मध्ये विकी कौशलने स्वराज्याचे धाकले धनी, छत्रपती शिवाजी महाराजांचे थोरले चिरंजीव आणि स्वराज्याचे दुसरे छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका साकारली. शंभूराजांच्या लूकमध्ये विकी अगदी शोभून दिसला आहे. 'छावा' २०२५ मधला सर्वात मोठा ओपनर ठरला. आता 'छावा'नंतर विकीच्या पुढच्या चित्रपटाची चाहते आतुरतेने वाट पाहात आहेत.

विकी लवकरच आपल्या आगामी 'एक जादूगर' या चित्रपटात दिसणार आहे. या सिनेमाचं पोस्टर समोर आलं आहे. यामध्ये विकी कौशल हा एका जादूगाराच्या भूमिकेत दिसत आहे. विकी हा गडद हिरव्या रंगाच्या व्हेल्वेट सूट, आकर्षक हॅट आणि हातात चमकणारी जादूची कांडी धरून उभा असल्याचं पोस्टरमध्ये दिसतंय. चित्रपटाचं पोस्टर पाहून चाहते त्याच्यावर प्रेमाचा वर्षाव करत शुभेच्छा देत आहेत. हा सिनेमा कधी प्रदर्शित होणार हे अद्याप गुलदस्त्यात आहे. सध्यातरी या सिनेमाविषयी कोणतीही अधिकृत माहिती समोर आली नाहीये. 'एक जादूगर'हा चित्रपट प्रसिद्ध दिग्दर्शक शुजित सरकार दिग्दर्शित करत आहेत. त्यांनी यापुर्वीपिकू आणि ऑक्टोबर सारखे उत्तम चित्रपट बनवले आहेत. या चित्रपटाची निर्मिती रायझिंग सन फिल्म्स करत आहे. विकी कौशलच्या इतर चित्रपटांबद्दल बोलायचे झाले तर, अभिनेता लवकरच संजय लीला भन्साळी यांच्या 'लव्ह अँड वॉर' चित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटात त्याच्यासोबत आलिया भट आणि रणबीर कपूर महत्त्वाच्या भूमिका साकारणार आहेत. यामध्ये दीपिका पदुकोणचाही कॅमिओ रोल असल्याची माहिती आहे. 'छावा'नंतर विकीला पुन्हा मोठ्या पडद्यावर बघण्यासाठी चाहते उत्सुक आहेत.



# बॉलीवूडने कायम कलेची चोरी केली



बॉलिवूड नवाजुद्दीन सिद्दिकी हिंदी चित्रपटसृष्टीतील एक अष्टपैलू अभिनेता म्हणून ओळखला जातो. आजवर त्याने वैविध्यपूर्ण भूमिका साकारत प्रेक्षकांच्या मनावर त्याच्या अभिनयाची छाप सोडली आहे. नुकताच नवाजुद्दीनचा 'कोस्टाओ' हा चित्रपट प्रदर्शित झाला आहे. यावेळी चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान नवाजुद्दीने नुकतीच एक मुलाखत दिली आणि या मुलाखतीत केलेल्या वक्तव्यांमुळे तो सध्या चर्चेत आला आहे. नवाजुद्दीनचा 'कास्टोओ' हा चित्रपट १ मे रोजी प्रदर्शित झाला; तर या चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान त्याने पूजा तलवारसह संवाद साधला. यावेळी नवाजुद्दीनने बॉलीवूडबद्दल मोठं वक्तव्य केलं. त्याने म्हटलं आहे, बॉलीवूडमध्ये चार- पाच वर्ष एकाच धाटणीचे चित्रपट बनवले जातात. जोवर प्रेक्षक बोअर होत नाहीत, तोपर्यंत हा प्रकार चालूच असतो. एखादा चित्रपट चालला की, तो चित्रपट चालला म्हणून पुढे लोक तसाच चित्रपट पुन्हा बनवतात; कारण त्यांना हा चित्रपटही चालेल असं वाटत असतं आणि याचं प्रमाण खूप वाढलं आहे, त्यामुळे लोकांना हा एक फॉर्मुला वाटतो आणि मग सगळे हाच फॉर्मुला वापरतात. पुढे त्याने अशातच आता मोठ्या प्रमाणात चित्रपटांचे सिक्वल काढले जात आहेत.

इंडस्ट्रीमध्ये सर्जनशीलतेची कमी आहे. सुरुवातीपासून बॉलीवूडने चोरी केली आहे. पूर्वी गाण्यांची चोरी केली, नंतर कथानक चोरलं आणि आता यात भर म्हणून चित्रपटांचे मोठ्या प्रमाणात सिक्वल काढले जात आहेत. सुरुवातीपासून इंडस्ट्रीमध्ये सर्जनशीलतेची कमतरता आहे. चोर कधीच सर्जनशील नसतो. बॉलीवूडने साऊथच्या चित्रपटांचे कथानक, तिकडच्या चित्रपटातील गाजलेले सीन या सगळ्यांचा इकडे रिमेक केला आणि या गोष्टीला खूप हलक्यात घेतलं जातं. पुढे नवाजुद्दीनने याच गोष्टींना वैतागून अनुराग कश्यपने बॉलीवूडला राम राम केल्याचं म्हटलं आहे. अनुराग कश्यपसह नवाजुद्दीने 'गँग्स ऑफ वासेपूर', 'देव डी', 'हड्डी' आदी चित्रपटांमध्ये काम केलं आहे. दरम्यान, नवाजुद्दीने आजवर 'बदलापूर', 'लंचब्रेक', 'जग्गा जासूस', 'हाऊसफुल ४', 'ठाकरे', 'रईस', 'मुन्ना मायकल', 'मॉम' यांसारख्या चित्रपटांमध्ये महत्तवाच्या भूमिका साकारल्या आहेत. नवाजुद्दीन सिद्दिकीला 'लंच ब्रेक' या चित्रपटातील भूमिकेसाठी सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्यासाठी 'फिल्मफेअर पुरस्कार', तर 'बदलापूर' चित्रपटासाठी नकारात्मक भूमिकेतील सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी 'झी सिने' पुरस्कारांनी सन्मानीत करण्यात आलं. त्यामुळे नवाजुद्दीनच्या कामाचं कायमंच कौतुक होताना दिसलं.



## मी इंडस्ट्रीच्या बाहेरची पण...

मुंबईत जिओ वर्ल्ड सेंटर येथे 'वेव्हज समिट २०२५'चा शुभारंभ झाला. यामध्ये भारतीय सिनेसृष्टीतील अनेक दिग्गजांनी हजेरी लावली. दीपिका पादुकोण हिने २००७ मध्ये 'ओम शांती ओम' या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केले. अलीकडेच दीपिकाने मुंबईतील 'वेव्हज २०२५ समिट'मध्ये तिच्या पदार्पणाबद्दल सांगितले. दीपिकाने सांगितले की, मला कधीच वाटले नाही की मी इंडस्ट्रीच्या बाहेरची आहे. 'द जर्नी' सत्रा दरम्यान, करण जोहरने हिंदी चित्रपटसृष्टीतील आतले आणि बाहेरचे कलाकार हा मुद्दा उपस्थित केला, त्यावेळी शाहरुख खानही उपस्थित होता. दीपिका म्हणाली, मी सुरुवात केली तेव्हा हे फक्त एक नवीन जग होते. मी बेंगळुरूची १६ वर्षांची मुलगी होते आणि फराह खान मला चित्रपटात घेण्यास उत्सुक होती. त्यावेळी मी बेंगळुरू आणि मुंबई असा प्रवास करत होते. त्यांनी माझे ऑडिशनही घेतले नाही. मला आठवतंय की मी त्यांना एकदा भेटले होते. मला कधीच असं वाटलं नाही की मी इंडस्ट्रीच्या बाहेरची आहे. फराह म्हणाली, मला तू एकदा शाहरुखला भेटावे असे वाटते. त्यावेळी शाहरुख 'चक दे इंडिया' चित्रपटाचे शूटिंग करत होता. तो म्हणाला की तो परत आल्यावर आपण एक मीटिंग घेऊ. त्याने माझे काही काम पाहिले होते, पण मला कधीच असं वाटलं नाही की मी इंडस्ट्रीच्या बाहेरची आहे, जी नवीन इंडस्ट्रीत स्वतःचे स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. दीपिकाच्या 'ओम शांती ओम' या पहिल्या चित्रपटाने तिला स्टार बनवले. शाहरूखने इंडस्ट्रीतील त्याच्या प्रवेशाबद्दल सांगितले. किंग खानने सांगितले की, जेव्हा मी मुंबईत आलो तेव्हा मला कधीच वाटले नव्हते की मी इंडस्ट्रीच्या बाहेरचा आहे. मला वाटत होते की हे जग माझे आहे, ही जागा माझी आहे.




# अर्जुन कपूरसोबत पुन्हा झळकणार करिना

बॉलिवूड अभिनेता अर्जुन कपूर दीर्घकाळापासून एका हिट चित्रपटाच्या प्रतीक्षेत आहे. अर्जुन कपूरची मुख्य भूमिका असलेले चित्रपट मागील काही काळात फ्लॉप ठरले आहेत. परंतु पुन्हा एकदा अर्जुन कपूरच्या कारकीर्दीत आशेचा किरण निर्माण झाला आहे, कारण त्याची जोडी करिना कपूरसोबत जमणार आहे. करिना आणि अर्जुन यांनी यापूर्वी २०१६ मध्ये प्रदर्शित 'की एंड का' या चित्रपटात एकत्र काम केले होते. हा चित्रपट यशस्वी ठरला होता. आर. बाल्की यांच्या दिग्दर्शनातील या चित्रपटाच्या कहाणीला लोकांची पसंती मिळाली होती. अर्जुन आणि करिना पुन्हा एकदा 'की अँड का २' चित्रपटासाठी एकत्र येणार असल्याची चर्चा आहे. करिना कपूरही मागील काही काळापासून मोठ्या हिटची आशा करत आहे. तर करिना कपूरसोबत काम करता येणार असल्याने अर्जुन हिट चित्रपटाची अपेक्षा करत आहे. करिना कपूर याचबरोबर आणखी काही चित्रपटांमध्ये दिसून येणार आहे, परंतु अर्जुन कपूरकडे फारसे चित्रपट नसल्याने तो करिनासोबतच्या चित्रपटावर लक्ष केंद्रीत करून असल्याचे समजते.

# अक्षय आणि सैफ करणार १७ वर्षांनी पुन्हा एकत्र काम

बॉलिवूडचे दोन लोकप्रिय स्टार अक्षय कुमार आणि सैफ अली खान १७ वर्षांनी पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर एकत्र दिसणार आहेत. प्रियदर्शन दिग्दर्शित एका सस्पेन्स थ्रिलर चित्रपटात ही जोडी धमाल करेल. दोघांनी शेवटचे २००८ मध्ये आलेल्या 'टशन' चित्रपटात एकत्र काम केले होते. या नवीन चित्रपटाच्या बातमीने चाहत्यांमध्ये उत्साहाची लाट निर्माण झाली आहे. अक्षय कुमार आणि सैफ अली खानच्या नवीन चित्रपटाबद्दल चाहतेही उत्सुक झाले आहेत. एका सूत्राच्या हवाल्याने म्हटले आहे की, 'अक्षय आणि सैफ नेहमीच एकमेकांच्या कामाचे चाहते राहिले आहेत. दोघांनाही एकत्र काम करायला आवडते. या चित्रपटाची पटकथा वाचताच त्याने ते करण्यास होकार दिला. सूत्राने असेही सांगितले की हा चित्रपट रोमांचक थ्रिलर आहे जो प्रेक्षकांना सुरुवातीपासून शेवटपर्यंत खिळवून ठेवेल. प्रियदर्शन दिग्दर्शित हा चित्रपट सस्पेन्स आणि मनोरंजनाचे उत्तम मिश्रण असेल. या चित्रपटाचे चित्रीकरण ऑगस्ट २०२५ मध्ये सुरू होण्याची अपेक्षा आहे आणि तो २०२६ मध्ये थिएटरमध्ये प्रदर्शित होईल. चित्रपटाचे शीर्षक आणि कथा अद्याप गुलदस्त्यात असली तरी, सूत्रांचा दावा आहे की ही एक शक्तिशाली कथा असेल. अक्षय आणि सैफच्या जोडीने 'मैं खिलाडी तू अनाडी', 'आंखें' आणि 'ये दिल्लगी' सारख्या चित्रपटांमध्ये जादू दाखवली आहे आणि आता चाहत्यांना या नवीन चित्रपटाकडूनही अशाच अपेक्षा आहेत. अक्षय कुमार आणि प्रियदर्शनची जोडी बॉलिवूडमध्ये हिट चित्रपटांची हमी आहे. या दोघांनी 'हेरा फेरी', 'गरम मसाला', 'भूल भुलैया' आणि 'दे दना दन' सारखे सुपरहिट चित्रपट दिले आहेत. सध्या, अक्षय आणि प्रियदर्शन त्यांच्या पुढच्या 'भूत बांगला' चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यस्त आहेत, जो १४ वर्षांनंतर एकत्र पुनरागमन करतो. याशिवाय, दोघेही 'हेरा फेरी ३' वरही काम करत आहेत, जे चाहत्यांसाठी आणखी एक मोठे आश्चर्य आहे.





# अमिषाला जाणवतेय जोडीदाराची कमतरता

बॉलीवूडमधील काही सुप्रसिद्ध अभिनेत्रींपैकी एक म्हणजे अमीषा पटेल. 'कहो ना प्यार है' या सुपरहिट चित्रपटातून तिने बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं. त्यानंतर अमीषाने करिअरमध्ये एकापेक्षा एक हिट चित्रपटांमध्ये काम केलं. अभिनेत्रीच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल बोलायचे झाले तर, ती ४९ वर्षीही एकाकी जीवन जगत आहे. याच एकाकी जीवनाबद्दल आणि ४९ व्या वर्षी अविवाहित असण्याबद्दल अमीषाने नुकतंच एका मुलाखतीत भाष्य केलं आहे. अभिनय क्षेत्रातील व्यग्रतेमुळे कुणाशी लग्न करणं तिला पटत नाही. तसंच एकाकी जीवन जगतानाही मी खुप आनंदी आहे असं ती म्हणते. एका मुलाखतीत तिने तिच्या याच वैयक्तिक आयुष्याबद्दल भाष्य केलं आहे. यावेळी अमीषा म्हणाली की, मला वाटतं की, मी माझे आयुष्य ज्या पद्धतीने जगत आहे, त्यामुळे मी खूप आनंदी आहे. मला जोडीदाराची कमतरता भासत नाही. मी माझ्या कामात इतकी व्यस्त आहे की, याची मला गरज नाही. मी अमीषा पटेल आहे आणि माझी मी एकटी आनंदी आहे. अमीषाला अभिनय क्षेत्रातील व्यग्रतेत कुणाशी लग्न करणं पटत नाही. याबद्दल तिने असं म्हटलं की, एखाद्या पुरूषाला तुमच्या छत्रछायेखाली राहणे खूप कठीण आहे. अर्थात, त्याला माझ्या आनंदापुढे इतर सर्व गोष्टींपेक्षा जास्त महत्त्व द्यावे लागते. त्यात कामाचे अनेक तास, अनियमित वेळापत्रक, कामाच्या वचनबद्धता आणि एकूणच हा प्रवास समजून घ्यावा लागतो. या सर्वांमध्ये मला वाटत नाही की, मी नात्याला योग्य तो न्याय देऊ शकते. यानंतर अभिनेत्रीला नातेसंबंध तिच्या प्राधान्य यादीत आहेत का? असे विचारले असता ती म्हणाली, देवाच्या कृपेने, मला खूप काही मिळाले आहे. कदाचित मी जे काही मागितले आहे; त्यापेक्षा जास्त मिळाले आहे. माझ्या चित्रपटांना बॉक्स ऑफिसवर प्रचंड यश मिळाले आहे आणि मी हे अभिमानाने सांगू शकते. मी अहंकाराने नाही तर हे खरं तेच बोलत आहे. दरम्यान, अभिनेत्री अमीषा विक्रम भट्ट यांच्याबरोबर पाच वर्षे रिलेशनशिपमध्ये होती. त्यांच्या नात्याला अभिनेत्रीच्या घरून विरोध होता. या विरोधामुळेच तिचे पालकांशी वाद झाले. नंतर तिने कणव पुरीबरोबरच्या नात्याचीही कबुली दिली होती, पण नंतर दोघांचं ब्रेकअप झालं होतं. तर प्रिती झिंटाचा एक्स बॉयफ्रेंड असणार्‍या नेस वाडियालादेखील तिने डेट केले होते. नेसला अमिषाशी लग्न करायचे होते, मात्र तिला करिअर करायचे होते. त्यामुळे हे दोघे वेगळे झाले.

# दीपिकामुळे नयनताराच्या करिअरला होतोय फायदा

१९९९ आजकाल, हिंदी चित्रपटसृष्टीचे डोळे नयनतारावर खिळले आहेत, जी हिंदी चित्रपटसृष्टीतील टॉप स्टार शाहरुख खान आणि आर. माधवन यांची नायिका बनली आहे. गगनाला भिडणार्या मानधनामुळे, हिंदी चित्रपट निर्मात्यांना यावर निर्णय घेण्यासाठी अजूनही वेळ लागत आहे. आई झाल्यापासून हिंदी चित्रपटसृष्टीतील नंबर वन नायिका राहिलेल्या दीपिका पदुकोणचा, जिनेआतापर्यंत पुन्हा चित्रपटांमध्ये काम सुरू केले नाही, त्याचा सर्वात जास्त फायदा दक्षिण चित्रपटसृष्टीतील एक नायिका अभिनेत्री नयनताराला होत असल्याचे दिसून येते. ख्रिश्चन कुटुंबात जन्मलेल्या नयनताराचे खरे नाव डायना मरियम कुरियन आहे. आजकाल, संपूर्ण उत्तर भारत नयनताराच्या दागिने विकणार्या कंपनीच्या जाहिरातींनी भरलेला आहे. नयनताराच्या या जाहिराती हिंदी भाषिक राज्यांमध्ये अतिशय विचारपूर्वक बनवलेल्या ब्रँडिंगखाली चालवल्या जात आहेत. सध्या हिंदी चित्रपटसृष्टीत दीपिकाच्या उंचीशी बरोबरी करणारी दुसरी कोणतीही नायिका नाही. दरम्यान, कृती सॅननकडून काही आशा होत्या पण आता नयनतारा दिनेश विजन कॅम्पमधून पुढे न जाण्याच्या तिच्या मजबुरीचा थेट फायदा घेत आहे. शाहरुख खानच्या 'जवान' या चित्रपटातून नयनताराने हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. आजकाल त्याला इतर काही मोठ्या हिंदी चित्रपटांच्या ऑफरही येत आहेत. महिला- केंद्रित चित्रपट बनवण्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या एका मोठ्या प्रॉडक्शन हाऊसनेही त्यांच्या पुढील हिंदी चित्रपटासाठी नयनतारा यांच्याशी संपर्क साधला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नयनताराने या चित्रपटासाठी तिचे मानधन १५ कोटी रुपये निश्चित केले आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे दिग्दर्शक अनिल रविपुडी यांच्या चिरंजीवी अभिनीत पुढील चित्रपटासाठी नयनताराने हेच मानधन मागितले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रविपुडी आता नयनताराच्या जागी आदिती राव हैदरीला घेण्यासाठी त्यांच्या टीमसोबत चर्चा करत आहेत. एवढ्या मोठ्या बजेटसाठी रविपुडीने कदाचित नयनताराला त्याच्या चित्रपटात कास्ट करणे टाळले असेल, परंतु अभिनेता आर माधवनच्या तमिळ चित्रपट 'टेस्ट'चे हिंदी डब केलेले आवृत्ती हिंदी भाषिक राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पाहिले जात आहे. हिंदी चित्रपट निर्मात्यांना वाटते की जर नयनताराला मोठ्या बजेटच्या ॲक्शन चित्रपटात चांगले सादर केले तर ती मोठ्या पडद्यावर एक नवा इतिहास रचू शकते.



# अनुपमासोबत झळकणार समांथा



लवकरच अभिनेत्री समांथा रुथ प्रभू ही अनुपमा परमेश्वरनसोबत 'परधा' या दक्षिण भारतीय चित्रपटात दिसून येणार आहे. या चित्रपटात समांथा ही पाहुण्या कलाकाराच्या भूमिकेत आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन प्रवीण कंदरेगुला करत आहेत. परधा चित्रपटात अनुपमा परमेश्वरन मुख्य भूमिकेत आहे, परंतु चित्रपटाच्या क्लायमॅक्समध्ये समांथाची व्यक्तिरेखा असणार आहे. परधा चित्रपटापूर्वी समांथा आणि अनुपमाने 'ए.आ..' या चित्रपटात एकत्र काम केले होते. समांथाचे नाव सध्या दिग्दर्शक राज निदिमोरुसोबत जोडले जात आहे. दोघेही डेट करत असल्याची चर्चा सुरू आहे. राज निदिमोरुसोबत समांथाने 'सिटाडेल : हनीबनी'मध्ये काम केले होते. राज या सीरिजशी निर्माता म्हणून जोडला गेला होता, तर समांथाने यात अभिनय केला होता. समांथा आता निर्माती म्हणून देखील सक्रीय आहे. अभिनेत्रीने स्वत:चे प्रॉडक्शन हाउस सुरू केले आहे. तसेच तिने एका चित्रपटाची निर्मितीही सुरु केली आहे. याचबरोबर ती काही बिगबजेट चित्रपटांमध्ये काम करत आहे.

# 'श्रीलीला'ला लागली लॉटरी



बॉलीवूड दक्षिणात्य अभिनेत्री श्रीलीला 'पुष्पा-२' या चित्रपटातील आयटम साँगमधून प्रसिद्धीच्या झोतात आली. गेल्या काही काळापासून कार्तिक आर्यनसोबतच्या नव्या चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटाच्या प्रदर्शनापूर्वीच श्रीलीला आणखी एका बिग बजेट प्रोजेक्टची ऑफर देण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. बॉलिवूडमधील तिच्या पदार्पणाबाबत चाहत्यांमध्ये प्रचंड उत्साह आहे. मीडिया रिपोर्टनुसार, डान्सिंग क्वीन म्हणून प्रसिद्ध असलेली श्रीलीला दिग्दर्शक राज शांडिल्य यांच्या आगामी बिग बजेट चित्रपटात झळकण्याची शक्यता आहे. अलिकडेच, श्रीलीला निर्माते महावीर जैन यांच्यासोबत स्पॉट करण्यात आलं, त्यानंतर ती राज शांडिल्य यांच्या आगामी चित्रपटात काम करणार असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत. या चित्रपटात श्रीलीला बॉलिवूड अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रासोबत रोमान्स करताना दिसणार असल्याचं म्हटलं जात आहे. महावीर जैन यांनी इन्स्टाग्रामवर श्रीलीलासोबतचा एक फोटो शेअर केला आणि लिहिले, आनंद एल राय सर यांच्या जादूला सुंदर आणि प्रतिभावान श्रीलीलासोबत पाहण्याची इच्छा आहे. मात्र, निर्मात्यांनी याबाबत अद्याप अधिकृत पुष्टी केलेली नाही. चाहते या जोडीची केमिस्ट्री पाहण्यासाठी आतुर आहेत. जर या दोघांनी एकत्र काम केले तर, श्रीलीलाचे बॉलिवूड पदार्पण दक्षिण आणि हिंदी चित्रपटसृष्टीच्या चाहत्यांसाठी एक खास पर्वणी ठरू शकते. याशिवाय श्रीलीला लवकरच अनुराग बसू दिग्दर्शित सिनेमातून बॉलिवूडमध्ये एन्ट्री करणार आहे.

# मी ग्रुपिझ्म करतोच !

बॉलीवूडमध्ये असलेलं ग्रुपिझम (गटबाजी) नेहमीच चर्चेचा विषय ठरतं. अनेकदा ही गटबाजी दिसूनही येते. गेल्या काही वर्षात मराठी सिनेइंडस्ट्रीतही या गटबाजीचं प्रमाण वाढताना दिसत आहे. मराठी सिनेसृष्टीत होत असलेल्या गटबाजीवर कलाकार नेहमीच व्यक्त होत असतात. या गटबाजीचा परिणाम कलाकारांवर आणि पर्यायाने त्यांच्या कामावर होत असल्याचा आरोप अनेक कलाकार करतात. काही दिवसांपुर्वी अभिनेत्री सविता मालपेकरांनी मराठीतील या ग्रुपिझमबद्दल थेट भाष्य केलं होतं. अशातच आता या ग्रुपिझमवर महेश मांजरेकर यांनीही त्यांचं मत व्यक्त केलं आहे.

महेश मांजरेकरांनी माध्यमाशी नुकताच संवाद साधला. यावेळी त्यांना 'महेश मांजरेकर मराठीत ग्रुपिझम करतात का?' असा प्रश्न विचारण्यात आला. या प्रश्नाचं उत्तर त्यांनी हो! हे खरं आहे. मी ग्रुपिझम करतोच. असं दिलं. याबद्दल ते पुढे म्हणाले की, त्यात लाजायचं काय? ताकाला जाऊन भांडं कशाला लपवायचं? मी पहिल्यापासून नव्या लोकांना चित्रपटात घेतलं आहे. तुम्ही लिस्ट काढून बघा. मी त्या त्या भूमिकेसाठी चांगले वाटणारे सगळे लोक घेतो आणि मराठी लोकांना घेतो. हिंदीमध्येही मराठी लोकांना घेतो. यानंतर महेश मांजरेकरांनी म्हटलं की, सिद्धूला घेऊन मी हिंदी चित्रपट करावा अशी इच्छा आहे. पण ते शक्य नाही, कारण त्यासाठी फायनान्स देणारा कोणीतरी हवा ना? हे अर्ध्या लोकांना कळत नाही. काही लोकांना वाटतं की, चित्रपट झाडावरचे चिंचोके देऊन केला जातो. पण तसं नाही त्यासाठी पैसे लागतात. मला माझ्या एखाद्या मराठी मुलाला घेऊन मोठा हिंदी चित्रपट करायला नक्की आवडेल. यांनाच घेतो आणि त्यांनाच घेतो हे बोलायला काय जातं? पैसे कोण देणार? यानंतर महेश मांजरेकरांनी सांगितलं की, मला सिद्धू हा जगातला श्रेष्ठ नट वाटतो. भरत जाधवही कमाल आहे. पण आता चित्र बदलेल आणि भरतला घेऊन मला एक मोठा चित्रपट करता येईल. पुढे ते म्हणाले की, मी मिक्टाशो करायचो तेव्हा पण काही लोक म्हणायचे की, आम्हाला घेऊन जात नाही. अरे मी काय पिकनिक नाही काढली? यापुढे महेश मांजरेकर म्हणाले, अवॉर्ड्सचे नॉमिनेशन काय मी ठरवत नाही. ज्यांना नॉमिनेशन असतं त्यांना घेऊन जातो. मी जेव्हा पाचशे लोकांना खुश करत असतो तेव्हा मी पाच हजार लोकांना नाखुश करत असतो. त्या लोकांना मी हेच सांगू इच्छितो की, माझी तुमच्याशी काही दुश्मनी नाही आणि पाचशे लोकांशीही माझं काही चांगलं नाही. ते नॉमिनेटेड आहेत, त्यामुळे त्यांना घेऊन जातोय. तुम्ही करा, तुम्हालाही घेऊन जाईल. या सगळ्यामुळे मी मिक्टा अवॉर्ड्स बंद केलं.



# प्रार्थना बेहेरे नवऱ्यासह करणार सिनेमा

मराठी सिनेसृष्टीतील सध्याच्या काही आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक अभिनेत्री म्हणजे प्रार्थना बेहेरे. प्रार्थनानं 'पवित्र रिश्ता' या गाजलेल्या टिव्ही मालिकेतून इंडस्ट्रीत पदार्पण केलं. त्यानंतर तिने काही प्रोजेक्ट्समधून काम केलं. पण तिला खरी ओळख मिळाली ती 'माझी तुझी रेशीमगाठ' मालिकेमुळे. या मालिकेत प्रार्थना आणि श्रेयस तळपदेच्या जोडीनं प्रेक्षकांच्या मनात घर केलं. शिवाय प्रार्थनाने 'मितवा', 'मिस्टर अँड मिसेस सदाचारी', यांसारखे चित्रपट केले. नुकतीच ती 'बाई गं' आणि 'चिकी चिकी बुबूम बूम' या चित्रपटांमध्ये झळकली होती. अशातच आता प्रार्थना अभिनेत्री म्हणून पुन्हा एकदा प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यास सज्ज आहे. लवकरच ती एका मराठी चित्रपटामधून मुख्य अभिनेत्री म्हणून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे आणि या चित्रपटाचं दिग्दर्शन तिचा नवरा अभिषेक जावकर करणार आहे. याबद्दल स्वत: प्रार्थनाने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत माहिती दिली आहे. प्रार्थनाचा मुख्य अभिनेत्री म्हणून आणि तिचा नवरा अभिषेक जावकरचे दिग्दर्शन असलेल्या या आगामी चित्रपटाचा मुहूर्त सोहळा नुकताच पार पडला. प्रार्थना व तिच्या नवर्याच्या आगामी मराठी चित्रपटाचा मुहूर्त अगदी पारंपरिक पध्दतीने पार पडला असून याचे काही खास क्षण तिने सोशल मीडियावर शेअर केले आहेत. शिवाय यानिमित्ताने अभिनेत्रीने तिच्या भावनाही व्यक्त केल्या आहेत. यावेळी प्रार्थनाने असं म्हटलं आहे की, अभिनेत्री म्हणून मी आणि दिग्दर्शक म्हणून माझे पती. आम्ही पाहिल्यांदाच एकत्र काम करत आहोत. पतीबरोबरचा माझा स्वप्नवत प्रवास सुरू होत आहे. तुमचे प्रेम आणि आशीर्वाद असूद्या. प्रार्थनाने शेअर केलेल्या या पोस्टखाली अभिजीत खांडकेकर, पूजा सावंत, अनघा अतुल, हेमळ इंगळे यांसारख्या अनेकांनी शुभेच्छा दिल्या आहेत. दरम्यान, प्रार्थना बेहेरे मनोरंजन क्षेत्रात सक्रीय आहे. शिवाय तिचा पती अभिषेक जावकर हादेखील याच क्षेत्रातील आहे. 'सिंघम' चित्रपटाची निर्मितीही अभिषेकनेच केली आहे. दरम्यान, प्रार्थना व तिचा पती अभिषेक हे दोघे मिळून कोणता नवा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस घेऊन येणार? हा चित्रपट नक्की काय असणार? चित्रपटाचं नाव काय असेल? याची चाहत्यांना उत्सुकता लागून राहिली आहे.



# मी नैराश्यात होतो

पुष्कर जोग काही दिवसांपूर्वी 'हार्दिक शुभेच्छा' या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. या चित्रपटात अभिनेत्री हेमल इंगळे प्रमुख भूमिकेत दिसली होती. अभिनेता अनेकदा त्याच्या वक्तव्यामुळे चर्चेत असतो. पुष्कर जोग सोशल मीडियावर मुलाखतींमध्ये अनेक बाबींवर त्याचे मत स्पष्टपणे मांडताना दिसतो. आता नुकत्याच एका मुलाखतीत महिनाभर तो नैराश्यात होता, असे वक्तव्य त्याने केले आहे. पुष्कर जोगने नुकतीच एक मुलाखत दिली. या मुलाखतीत अभिनेत्याने तो नैराश्यात गेला असल्याचा खुलासा केला. तसेच त्याचे कारणही सांगिते. अभिनेता म्हणाला, मी गेला महिनाभर नैराश्यात होतो. कारण- माझ्या मनात जे आहे, ते मी बोलतो. ते मला बोलावंसं वाटतं. मी मुळात फिल्मी नाहीये. मला खोटं बोलता येत नाही. मी नैराश्यात होतो. कारण- मराठी चित्रपट चालत नाहीत. ही वस्तुस्थिती आहे. जर लोक म्हणत असतील दुसरा आठवडा, तिसरा आठवडा असे चित्रपट चालत आहेत, अमुक इतकं कलेक्शन झालं आहे. तर सगळे खोटं बोलत आहेत. कलेक्शन किती होतं, हे मला माहीत आहे. सगळीकडचे पैसे कट होऊन निर्मात्याच्या अकाउंटमध्ये किती जातात, हेही मला माहीत आहे. मला असं म्हणायचं आहे की, सगळे आपण एका भ्रमात आहोत. तो भ्रमाचा भोपळा आता काही वर्षांत फुटणार आहे. ओटीटीमध्ये जर जास्त लोकांनी पाहिलं, तर निर्मात्याला १० लाख रुपये मिळतात. चित्रपट अडीच-तीन कोटींचा असतो. चित्रपटगृहांमधून जास्त पैसे मिळालेले नसतात. तुम्हाला जेव्हा वाटतं की, आता महाराष्ट्राची सबसिडी मिळणार आहे, त्यावेळी सरकार बदलतं. तर, मग आम्ही नुकसानभरपाई कुठून करायची? मराठी माणूस मराठी चित्रपट पाहतो का?, असे म्हणत अभिनेत्याने मराठी चित्रपटाला प्रेक्षक नसल्याची खंत व्यक्त केली.



# भारतीय चित्रपटातील फर्स्ट लेडी-स्टंट क्वीनः ललिता पवार

'काठेवाडी घोड्यावर पुढ्यात घ्या हो मला' तसेच 'व्हटाचं डाळिंब फुटलं...' १९४० च्या दशकात 'जय मल्हार' चित्रपटात या दोन्ही लावण्या ललिता पवार या अभिनेत्रीवर चित्रित झाल्या होत्या. आधीच्या दोन-तीन पिढ्यातील रसिकांनी खाष्ट सासूच्या, दुष्ट स्त्रीच्या व 'रामायण' मालिकेत मंथरेच्या भूमिकेत या दिग्गज अभिनेत्रीला पाहिले. त्यांनी एक काळ तब्बल २० वर्षे नायिकेच्या व अनेक बहुढंगी भूमिका केल्या.



आज ललिताबाईने चक्क मूकपटापासून १९२८ पासून चित्रपटात योगदान दिले. त्या काळी चित्रपट अभिनय संस्था नव्हत्या. अभिनय त्यांच्या नसानसात नैसर्गिकरीत्या भिनला होता. त्या स्वतःच अभिनयाची पाठशाळा होत्या. १९१३ साली दादासाहेब फाळकेच्या 'भस्मासुर मोहिनी' चित्रपटात पहिली स्त्री मूकपटातील नायिका दुर्गाबाई कामत व पहिली स्त्री बालकलाकार कमला गोखले होत्या. सिनेमात काम करताना प्रसंगातील कल्पनाचित्रे मनात रंगविताना जो आपसूकच नैसर्गिक भाव चेहर्यावर प्रकट होतो, हाच नैसर्गिक अभिनय. कुठल्याही प्रसंगात समरस झाल्यास नेत्र, भृकुटी, कपोल, नासिका, औष्ठद्वय यांच्या नैसर्गिक हालचाली आपोआप सहज होतात व चेहर्यावर प्रसंगानुरूप छटा उमटतात. हाच अभिनय. अभिनयाची ही रीत ललिताला अवगत होती. ७० वर्षांच्या चित्रपट कारकीर्दीत त्यांनी स्टंट, पौराणिक, सामाजिक, ऐतिहासिक, धार्मिक, कौटुंबिक अशी वेगवेगळी स्त्री पात्रे साकारली.

ललिता पवार नाशिक जिल्ह्यातील येवला येथील लक्ष्मणराव सगुण यांची कन्या. १८ एप्रिल १९१६ साली इंदूरला आजोळी अंबाबाईच्या देवळात जन्म झाला म्हणून तिला 'अंबू' हे नाव मिळाले. त्यांनी मूकपट, मराठी, हिंदी व गुजराथी बोलपट मिळून ७०० च्या वर चित्रपटात कामे केली. जगात सर्वात जास्त चित्रपटात कामे करण्याचा रेकॉर्ड मनोरमा या दाक्षिणात्य अभिनेत्रीच्या नावे आहे. बॉलिवूडमध्ये हा रेकॉर्ड ललिता पवारच्या नावे आहे. यामुळे तिची 'भारतीय चित्रपटातील फर्स्ट लेडी' म्हणून गणना व ख्याती झाली. याचा समस्त महाराष्ट्रीयन रसिकांना अभिमान वाटावा. चित्रपट व्यवसायात एवढे मोठे योगदान देऊनही तिला राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार मिळाला नाही, ही खंत पु. ल. देशपांडे यांनी अनेकदा व्यक्त केली होती. या थोर अभिनेत्रीच्या संपूर्ण चित्रपट कारकीर्दीवर प्रकाश टाकणे, मोठ्या पुस्तकाचा विषय आहे. या लेखात मूकपटापासून स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंतच्या तिच्या चित्रपट जीवनाचा मागोवा घेऊ...

१९२८ सालची गोष्ट आहे. कोल्हापूर मुक्कामी सिनेमा शूटिंग पाहण्याच्या जिज्ञासेने जवळच्या स्टुडिओच्या भिंतीवरून आत उडी घेतली. चौकीदाराने पकडून मूक सिनेमातील दिग्गज नानासाहेब सरपोतदारांकडे नेले. अवघ्या १२ वर्षांच्या अंबूच्या त्या देखण्या, करारी व निर्भय चेहऱ्यात त्यांना त्यांच्या चित्रपटातील नायिका दिसली. 'पतितोद्धार' या चित्रपटाद्वारे तिचा चित्रपटात प्रवेश झाला. नैसर्गिक अभिनय अंगात भिनल्यामुळे तिने या संधीचे सोने केले. १९२८ 'पतितोद्धार' ते १९९८ 'भाई' ही तिची कारकीर्द. पुढील दोन वर्षात नऊ चित्रपट केलेत. 'ग्यालंट हार्ट' चित्रपटात तिचे लावण्य खुलले. लांब व मुलायम केसांच्या वेण्या, मोहक व रुबाबदार चेहरा. हॉलिवूड अभिनेत्रीच शोभणाऱ्या ललिताची तुलना तत्कालीन जाहिरातदार व पत्रकार वसंतराव मराठे यांनी हॉलिवूड गाजवणारी ग्रेटा गार्बोशी केली. परंतु, या सुंदर चेहऱ्याला लवकरच दृष्ट लागली. अल्पकाळात आपल्या मागून येऊन पुढे गेल्यामुळे तत्कालीन काही अभिनेत्रींनी तिला त्रास देऊन संपविण्याचाही प्रयत्न केला, अशी माहिती आहे. धाडशी अंबू पोहणे, तलवारबाजी, लाठीकाठी, घुडसवारी आदी कलाबाजीत निपूण होती. स्टंट चित्रपटात ती डमी न वापरता साहसी दृश्ये सहज शूट करायची. या तिच्या धाडसी व शूर गुणांमुळे तिचे 'स्टंट क्वीन' म्हणूनही तिचे नामकरण झाले होते. 'जंग-ए- आझादी' चित्रपटात मा. भगवानच्या हातून थप्पड खाण्याच्या प्रसंगात त्यांचा डावा डोळा कायमचा बारीक झाला होता. बॉलिवूडमधील दक्षिणेत जाऊन चित्रपटात कामे करणारी ती पहिली स्त्री अभिनेत्री ठरली. 'समशेर बहाद्दूर' व 'ठकसेन राजपुत्र' हे तिचे तेथील मूकपट खूप गाजलेत. 'नेकदोस्त' या चित्रपटात तिहेरी भूमिका केली.

नायिका, खलनायिका व आई अशी विविधांगी भूमिका करणारी ही पहिली अभिनेत्री ठरली. १९३२ साली १५ चित्रपटांचा करार करून पूर्ण केले. १९३५ साली 'हिम्मत-ए-दर्द' या बोलपटात पदार्पण केले. चंद्रकांत कदम नायक व तिच्या थोरल्या बहिणीचे यजमान जी. पी. पवार हे निर्देशक होते. तिचा जी. पी. पवारांशी विवाह झाला होता. एवढे मात्र खरे की, या चित्रपटाद्वारे त्या अंबू सगुणेच्या 'ललिता पवार' झाल्या.

ललिता पवारने १९३८ साली 'अंबिका पिक्चर्स' ही स्वतःची संस्था काढली. जवळपास ४० चित्रपट काढलेत. 'दुनिया क्या है' हा तिचा पहिला सामाजिक चित्रपट ठरला. मा. विनायक यांचा 'अमृत', आनंदकुमार यांचा 'गोरा कुंभार', भालजी पेंढारकर यांचा 'नेताजी पालकर', व्ही. शांतारामसोबत 'होनाजी बाळ', 'मतवाला शायर', 'परछाई' व 'दहेज' या नावाजलेल्या चित्रपटात तिने कीर्तिमान शाबीत केला. त्या काळातील प्रतिभावान कलाकार बाबुराव पेंढारकरांबरोबर ललिता पवारची जोडी खूप गाजली. मूकपटापासून बोलपटापर्यंत आजवर ललिता पवारने अभिनयाचे सर्व कंगोरे उलगडून दाखविले, तरीपण प्रभातच्या १९४४ सालच्या 'रामशास्त्री' चित्रपटातील तिने साकारलेली 'आनंदीबाई'ची भूमिका सर्वश्रेष्ठ ठरली. त्यातील एक प्रसंग देण्याचा मोह आवरीत नाही. प्रसंग असा-- ध चा मा करून नारायणचा वध करण्याआधीच्या एका दृश्यात रघुनाथराव, आनंदीबाई, नारायणची पत्नी, नारायण ही पात्रे उभी राहून संवाद साधत होते. हातावर लोंबणारे मोठ्या व लांब पदराचे नऊवारी पातळ, खोप्याचा आंबाडा, मोठी नथ अशा मालकिणीच्या तोऱ्यात आनंदीबाई खरमरीत संवाद म्हणत तिथून फणकार्याने निघून जाताना हातावरील लोंबता पदर अशारीतीने मागे भिरकावला की, बाजूस उभ्या असलेल्या नारायणच्या बायकोच्या कपाळावरील ठसठशीत कुंकू अलगत पुसल्या गेले. एकाच 'टेक'मध्ये हा प्रसंग कॅमेराबद्ध होतो. हे केवळ ललिताच्या परफेक्ट टाईमिंग अभिनयामुळे. चित्रपटातील हा प्रसंग व ललिताबाईंचा अजरामर अभिनय पाहण्यासाठी रसिकांनी हा दर्जेदार चित्रपट अनेकदा पाहिला. प्रसिद्ध चित्रपट समीक्षक व पत्रकार बाबुराव पटेल यांनीही ललिताच्या अभिनयाची तारीफ केली. ललिताबाईंची चित्रपट कारकीर्द विस्तीर्ण आहे. इथपर्यंत तिच्या मराठी चित्रपटातील योगदानाचा धावता आढावा घेतला.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ललिताबाईंच्या अभिनयाचा वारू हिंदी-मराठी चित्रपटात चौफेर उधळला. त्यासाठी स्वतंत्र लेख लिहावा लागेल. हिंदी चित्रपटात विविध भूमिका साकारून १९९८ साली 'भाई' या चित्रपटात काम करून त्यांनी आपला दीर्घ अभिनय प्रवास थांबविला. भारतीय चित्रपटसृष्टीत भरभरून योगदान देऊन भरभराटीला आणणाऱ्या कलाकारात ललिता पवार श्रेष्ठ ठरतील. भारतीय चित्रपटसृष्टीतील 'फर्स्ट लेडी', 'स्टंट क्वीन' बहुआयामी व्यक्तिमत्त्व रजत पडद्यावर प्रदर्शित करणाऱ्या ललिताबाईंची प्राणज्योत २४ फेब्रुवारी १९९८ रोजी मालवली. धगधगते व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड कायमचे गेले, पण तिच्या चित्रपटांद्वारे अभिनयाचे विद्यापीठ रसिकांना व नवोदित कलाकारांना मिळाले, हे नक्की!

**रमेश पोफळी**

# मांडलेकर दिग्दर्शित करणार हिंदी सिनेमा



राष्ट्रीय पुरस्कार विजेते अभिनेता मनोज बाजपेयी पुन्हा एकदा आपल्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांना आश्चर्यचकित करण्यासाठी सज्ज झाले आहेत. त्यांच्या 'गव्हर्नर' या नवीन चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे, ज्यामध्ये ते राज्यपालाची मुख्य भूमिका साकारणार आहेत. वृत्तानुसार, हा राजकीय थ्रिलर चित्रपट विपुल शाह यांच्या प्रॉडक्शन हाऊस सनशाइन पिक्चर्सच्या बॅनरखाली बनवला जात आहे. हा चित्रपट चिन्मय मांडलेकर दिग्दर्शित करत आहेत आणि त्याचे चित्रीकरण जुलै-ऑगस्ट २०२५ मध्ये सुरू होण्याची अपेक्षा आहे. 'गव्हर्नर' हा एक रोमांचक राजकीय थ्रिलर चित्रपट आहे, जो मनोज बाजपेयीच्या कारकिर्दीत आणखी एक उत्तम अभिनयाची भर घालणार आहे. गेल्या दोन वर्षांपासून सनशाइन पिक्चर्समध्ये या प्रकल्पावर काम सुरू होते. यापूर्वी अपूर्व सिंग कार्की (सिरफ एक बंदा काफी है) या चित्रपटाचे दिग्दर्शन करणार होते, परंतु त्यांच्या इतर कामांमुळे त्यांना हा प्रकल्प सोडावा लागला. त्यानंतर मनोज बाजपेयी यांनी चिन्मय मांडलेकरला दिग्दर्शक म्हणून सुचवले. मनोज आणि चिन्मय यांनी अलीकडेच नेटफ्लिक्स इंडियाच्या आगामी कॉप ड्रामा सीरिज 'इन्स्पेक्टर झेंडे' मध्ये एकत्र काम केले आहे. 'गँग्स ऑफ वासेपूर', 'स्पेशल २६', 'जोरम' आणि 'गुलमोहर' सारख्या चित्रपटांमधील मनोज बाजपेयीच्या उत्कृष्ट अभिनयामुळे त्याला प्रेक्षक आणि समीक्षकांचे प्रेम मिळाले आहे. अलीकडेच त्याने नीरज पांडेच्या नेटफ्लिक्स चित्रपटाचे चित्रीकरण पूर्ण केले आहे. त्यानंतर तो 'गव्हर्नर'चे चित्रीकरण सुरू करणार आहे. मनोजकडे शेखर कपूरचा 'मासूमः द न्यू जनरेशन' आणि राम गोपाल वर्माचा 'भूत इन पोलिस स्टेशन' यासह इतर अनेक मोठे प्रकल्प आहेत. याशिवाय, अमेझॉन प्राइम व्हिडिओची सुपरहिट सीरिज 'द फॅमिली मॅन' चा तिसरा सीझन देखील २०२५ च्या दिवाळीच्या सुमारास प्रदर्शित होण्याची अपेक्षा आहे.

# पंडित जितेंद्र अभिषेकी.. वाचन मैफिल...






नुकतेच अभिषेकी हे पुस्तक वाचण्यात आले. जणू एखाद्या मैफिलीला बसल्यासारखे वाटले. अनेक गाण्यांची जन्म कहाणी त्यामागचे पंडितजींचे कष्ट , रियाज सगळा जणू डोळ्यासमोर आला.

पंडितजी म्हणायचे संगीतात करिअर करा पण शिक्षणाकडे दुर्लक्ष करू नका. माधुकरी मागून पंडितजींनी आपले शिक्षण पूर्ण केले. त्यामुळे अन्नाला त्यांनी कधीच नावे ठेवली नाहीत. पंडितजींचे शब्दकोशात सहज हा शब्दच नव्हता. त्यांनी जे जे केलं ते पराकोटीच्या तन्मयतेने त्यांनी केलं आणि आपल्या शिष्यांकडूनही त्यांची तीच अपेक्षा असे.

**खुद से बेखबर हो कर दिल से एक सजदा कर..**

**बंदगी नही होती सिर्फ सर झुकाने से...**

असे त्यांचे गुरु अजमत हुसेन खान म्हणत असत.

पंडितजींनी आकाशवाणी मुंबई येथे काम केले. कोकणी आणि पोर्तुगीज भाषा त्यांना अवगत होत्या. ते दोन्ही भाषेतील बातमीपत्र तयार करायचे, आणि कोकणीतून बातम्या देण्याचे काम अधिकाऱ्यांनी पंडितजींवर सोपवले होते. पुढे जवळ जवळ ३०० कोकणी गीतांना पंडितजींनी चाली दिल्या. पंडितजींनी १९५२ ते १८५८ अशी सात वर्षे आकाशवाणीवर नोकरी केली. आणि शेवटपर्यंत आकाशवाणी विषयी ते कृतज्ञच राहिले.

पंडित जी म्हणत..गाण्यात तालाच्या ज्ञानापेक्षा लयीच्या जाणिवेला जास्त महत्त्व आहे. ताल हा हिशोबासारखा असतो. तर लय ही गाण्याची शक्ती असते. ताल प्रयत्नाने येऊ शकतो. लयीची जाणीव मुळातच असावी लागते.

कालांतराने आकाशवाणीची नोकरी पंडितजींनी सोडली. पंडितजींनी चाळिशीच्या आतच संगीत रंगभूमीवर अभिषेकी युगनिर्माण करण्याचा चमत्कार घडवला. पंडितजींच्या शब्दकोशात अशक्य शब्द नव्हता. अशक्य गोष्टींशी झुंज देणं हे त्यांचं जणु प्राक्तन होतं.

लग्नाच्या वेळी पंडितजींनी सासऱ्यांना शब्द दिला होता.. आज माझ्याकडे गाण्याशिवाय दुसरं काही नाही. पण याच गाण्यावर एक दिवस मी स्वतःचे घर बांधीन. विद्याताई म्हणजे पंडितजींच्या पत्नी नेहमी सांगतात आमच्या कुटुंबात ह्यांचा शिष्य परिवार ही सामील आहे. त्याशिवाय आमच्या कौटुंबिक जीवनाला पूर्तता नाही. ह्यांची शिष्य मंडळी गोड आणि सुरेल आहेत. त्यांना सांभाळण्याची ईश्वराने मला संधी दिल्याबद्दल मी धन्यता मानते. गुरु शिष्य हे नातेच वेगळे आहे.

काटा रुते कुणाला या गाण्याची कथा पुस्तक आहे. एकदा शांताबाई एका शब्दापाशी अडल्या. तेव्हा पंडितजींनी एक शेर ऐकवला..

लोग काटो की बात करते है. हमने तो फुलो से जखम खाये है.

यानंतर हे गीत शांताबाई शेळके यांनी पूर्ण केले.

काटा रुते कुणाला हे गीत म्हणजे शांताबाई आणि पंडितजी यांच्या कलेचा उत्तुंग आविष्कार आहे. पंडितजींनी संगीत दिलेल्या १७ नाटकांपैकी सात नाटके जास्त गाजली. पुस्तकाचे स्वरूप नेटके आणि देखणे आहे. पंडितजींची अनेक दुर्मिळ छायाचित्रे पुस्तकात आहेत.

पंडितजींशी संबंधित अनेक संदर्भ, सगळी माहिती संकलित केली आहे. पंडित जी यांचे मंगेशी येथील घर. पुण्यातील घर, मुंबईतील घर, लोणावळा येथील घर. त्या सगळ्या घरांच्या कथा. त्या घरात पंडित जी यांनी पाळलेले प्राणी त्यांचं झाडांवर असलेले प्रेम पुस्तकात सहजतेने प्रकट झाले आहे.

अभिजात गायकी मधील खूप मोठे व्यक्तिमत्व पंडित जितेंद्र अभिषेकी. पण त्यांचा संघर्ष, त्यांचे यश, त्यांचे परदेश दौरे. त्यांचे शिष्यांशी असलेले कौटुंबिक संबंध. एवढा सगळा गोतावळा असूनही एक वत्सल कुटुंबप्रमुख म्हणून पंडितजी कुठेही कमी पडले नाहीत.

शैला मुकुंद यांनी लिहिलेलं अभिषेकी हे पुस्तक संगीत प्रेमी रसिकांनी आणि पंडितजींच्या चाहत्यांनी आवर्जून वाचावे. सहज सोपी भाषा, सुंदर छायाचित्रे असं भरगच्च ऐवज जणू एका मैफलीचा आनंद देऊन जाईल यात काही शंकाच नाही.

**श्रीधर मधुकर खेडगीकर**
**प्रिसिजन वाचन अभियान, सोलापूर**
९४२३५३६०८८४

---

# श्रेयस तळपदे अन् तुषार कपूर झळकणार 'या' नव्या चित्रपटात

मराठीसह बॉलिवूड कलाविश्व गाजवणारा स्टार अभिनेता श्रेयस तळपदे लवकरच नव्या सिनेमातून प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यास सज्ज झाला आहे. श्रेयसने मराठी-हिंदीबरोबरच दाक्षिणात्य सिनेसृष्टीतही त्याची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. आता लवकरच तो एका बॉलिवूड चित्रपटात पाहायला मिळणार आहे. हॉरर कॉमेडी असलेल्या 'कपकपी' या चित्रपटात श्रेयस तळपदे आणि तुषार कपूर यांची मुख्य भूमिका आहे. गेल्या वर्षी या चित्रपटाची घोषणा करण्यात आली होती. त्यानंतर आता श्रेयश-तुषारच्या या चित्रपटाची रिलीज डेटही जाहीर करण्यात आली आहे. प्रसिद्ध दिग्दर्शक संगीत शिवन यांनी या सिनेमाचं दिग्दर्शन केलं आहे. परंतु २०२४ मध्ये त्यांचं निधन झालं.

त्यानंतर आता बऱ्याच कालावधीनंतर 'कपकपी' चित्रपटाच्या नव्या पोस्टरसह प्रदर्शनाच्या तारखेवरुन सुद्धा पर्दा हटविण्यात आला आहे. 'कपकपी' सिनेमा २३ मे २०२५ रोजी जगभरात प्रदर्शित करण्यात येणार आहे. हा चित्रपट २०२३ मध्ये आलेल्या मल्याळम ब्लॉकबस्टर 'श्रणाशम'चा हिंदी रिमेक आहे. 'कपकपी' चित्रपटात श्रेयस तळपदे आणि तुषार कपूरसह सिद्धी इंदानी, अभिषेक कुमार, जय ठक्कर हे कलाकारही महत्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. 'गोलमाल अगेन'नंतर श्रेयस तळपदे आणि तुषार कपूर यांची जोडी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. त्यामुळे सिनेरसिक सुद्धा प्रचंड उत्सुक आहेत.




# 'हसीन दिलरुबा ३'ची अपडेट समोर



बॉलिवूड अभिनेत्री तापसी पन्नूने अनेक चित्रपटांमध्ये काम केले आहे. विविध भूमिका साकारत तिने प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. तिचा 'हसीन दिलरुबा' हा चित्रपट चांगलाच गाजला. यातील तिच्या अभिनयाचे अनेकांकडून कौतुक करण्यात आले. यानंतर 'फिर आई हसीन दिलरुबा' देखील मोठा प्रतिसाद मिळाला होता. आता 'हसीन दिलरुबा ३' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. तापसी पन्नू आणि विक्रांत मेसीच्या जोडीला प्रेक्षकांचे खूप प्रेम मिळाले. या थ्रिलर मिस्ट्री सीक्वेलमध्ये राणी (तापसी) आणि रिशू (विक्रांत) यांचा रोमान्स आणि भूतकाळात केलेल्या घटनांचा परिणाम पाहायला मिळाला. आता पुन्हा एकदा राणी आणि रिशू येत आहेत. माहितीनुसार, 'हसीन दिलरुबा ३'ची स्क्रिप्टिंग सुरू झालं आहे. तापसी आणि लेखिका कनिका ढिल्लन यांनी एका मुलाखतीत 'हसीन दिलरुबा ३'बाबत ही कहाणी अजून संपलेली नाही अजून बरंच काही बाकी आहे, असे सांगितले आहे. त्यामुळे आता चित्रपटाच्या पुढील भागाची प्रेक्षकांची उत्सुकता देखील अधिक वाढली आहे. मात्र या चित्रपटाच्या प्रदर्शनाबाबत कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. 'हसीन दिलरुबा' हा २०२१ मध्ये थेट नेटफ्लिक्सवर रिलीज झाला होता. त्यानंतर गेल्यावर्षी २०२४ मध्ये 'फिर आयी हसीन दिलरुबा' प्रदर्शित झाला. यामध्ये सनी कौशलची एन्ट्री पाहायला मिळाली. आता या चित्रपटाच्या पुढील भागाची प्रेक्षकांना अधिक उत्सुकता लागली आहे.



**साहित्यसम्राट आचार्य अत्रे यांच्या 'श्यामची आई' या राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त चित्रपटातील 'श्याम'ची म्हणजे छोट्या साने गुरुजींची भूमिका साकारणारे ज्येष्ठ अभिनेते माधव वझे (वय ८६) यांचे नुकतेच निधन झाले. वझे यांच्या सिनेसृष्टीतील योगदानाचा घेतलेला आढावा...**

# श्याम पोरका झाला..!!



छडी लागे छम छम विद्या येई हे लोकप्रिय गीत आहे श्यामची आई या गाजलेल्या चित्रपटातलं. १९५३ साली हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. अभिनेत्री वनमाला, दामू अण्णा जोशी, सुमती गुप्ते, बाबुराव पेंढारकर अशा मातब्बर कलाकारांनी हा चित्रपट अभिनित केला होता. साने गुरुजींच्या श्यामची आई ह्या पुस्तकाचा आधार घेऊन आचार्य अत्रे यांनी यावर चित्रपट बनवण्याचे ठरवले. यात श्यामची मुख्य भूमिका साकारणाऱ्या कलाकाराचा म्हणजेच माधव वझे यांचे नुकतेच निधन झाले त्याबद्दल त्यांच्या बाबत थोडक्यात आढावा घेऊ...

माधव वझे यांचा जन्म २१ ऑक्टोबर १९३९ रोजी पुणे येथील वझे कुटुंबात झाला. शनिवारवाड्या समोरच त्यांचे घर होते. लहानपणापासुन ते हुशार नि चुणचुणीत होते. त्यांचे शालेय शिक्षण नूतन मराठी विद्यालयात झाले. शाळेत असताना नाटकात भाग घेणे, श्लोक, कविता यांचे पाठांतर करायचे. आचार्य अत्रे यांनी 'श्यामची आई' या पुस्तकावर चित्रपट बनवायचे ठरविले.



श्यामची आई म्हणुन वनमाला यांची निवड झाली आणि श्यामच्या भूमिकेसाठी एका लहान मुलाला बोलावले. चित्रीकरणास सुरुवातही झाली होती, पण वनमालाबाईंना तो मुलगा काही पसंत पडला नाही. म्हणुन चित्रीकरण थांबवुन श्यामसाठी दुसऱ्या मुलाचा शोध सुरु झाला. केशवराव भोळे आणि ज्योत्स्ना भोळे या सांगीतिक दांपत्याने आचार्य अत्र्यांना लहानग्या माधवचे नाव सुचवले. अत्रे मग माधवच्या घरी आले, त्यांच्या आईवडिलांशी बोलले.

अत्र्यांना तर माधव आवडला होताच पण वनमालाबाईंनाही हा मुलगा श्याम म्हणुन पसंत पडला. पुढे मुंबईला अन कोकणात चित्रपटाचे चित्रीकरण व्यवस्थित पार पडले. चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर आचार्य अत्र्यांनी श्यामला हत्तीवर बसवुन मुंबईतील दादर विभागात साखर वाटली होती ही एक या चित्रपटाची खास आठवण म्हणावी लागेल. चित्रपट आणि त्यातील गाण्याचे मोठे कौतुक झाले. शिवाय बालकलाकार माधव वझे यांचेही कौतुक करण्यात आले. चित्रपटाला राष्ट्रपतींचे सुवर्णपदकही मिळाले असे यश मिळवणारा हा पहिला मराठी चित्रपट ठरला. माधवजी आचार्य अत्र्यांबरोबर या पुरस्कार समारंभासाठी दिल्लीलाही गेले. या चित्रपटानंतर त्यांनी 'वहिनीच्या बांगड्या' या चित्रपटात बालकलाकाराची भुमिका केली. हा चित्रपट देखील तुफान यशस्वी ठरला.

शालेय शिक्षण संपल्यानंतर पुढील शिक्षण त्यांनी पुण्याच्याच सर परशुरामभाऊ महाविद्यालयात घेतले पुणे विद्यापीठातुन मराठी आणि इंग्रजीमध्ये एम. ए. केले. त्यानंतर नेस वाडिया महाविद्यालयात त्यांनी इंग्रजीचे प्राध्यापकाची नोकरी स्वीकारली. ललित कला केंद्रात नाट्यविषयक प्राध्यापक म्हणुनही काम केले.

अभिनेता, दिग्दर्शक, नाट्यशिक्षक आणि नाट्यसमीक्षक या नात्याने त्यांनी विविध ठिकाणी आयुष्यभर आपली सेवा केली. त्यांनी काही पुस्तकेही लिहिली आहेत. त्यातले एक महत्वाचे पुस्तक म्हणजे 'श्यामची आई' आचार्य अत्रे आणि मी. पुढे एवढंसं आभाळ, श्री इडियट्स अशा मोजक्या चित्रपटातुनही काम केले आहे.

श्री इडियट्स या चित्रपटात त्यांनी काम केले होते. या चित्रपटात आत्महत्या करत असलेला जॉय लोबो तुम्हाला आठवतो का? याच जॉयच्या वडिलांच्या भूमिकेत आपल्याला त्यांना पाहायला मिळाले होते. तसेच त्यांनी काही वर्षांपूर्वी प्रदर्शित झालेल्या आलिया भट आणि शाहरुख खानच्या डिअर जिंदगी या चित्रपटात देखील काम केले होते. ते आलिया भटच्या आजोबांच्या भूमिकेत दिसले होते.

माधव वझे यांनी केवळ अभिनयाकडेच लक्ष केंद्रित केले नाही तर त्यांनी आपल्या शिक्षणाला देखील तितकेच महत्त्व दिले. ते पेशाने शिक्षक आहेत काहीच वर्षांपूर्वी पुण्याच्या वाडिया कॉलेजमधून इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून ते निवृत्त झाले. अभिनयासोबतच दिग्दर्शनाकडे देखील त्यांचा कल आहे.

परशुराम देशपांडे यांनी मराठीत रूपांतरित केलेल्या शेक्सपियरच्या हॅम्लेट या नाटकाचे दिग्दर्शन माधव वझे यांनी केले होते. आज श्यामची आई या चित्रपटाला प्रदर्शित होऊन इतकी वर्षे लोटली तरीही चित्रपटातला निरागस श्याम प्रेक्षकांच्या मनात घर करून गेला आहे. श्यामची आई' या चित्रपटामुळे प्रकाशझोतात आलेले माधव वझे हे उत्तम नट आहेत आणि त्यांचा रंगभूमीचा अभ्यासदेखील दांडगा आहे.




१९५३ साली प्रदर्शित झालेला 'श्यामची आई' हा सिनेमा आजच्या पिढीला आठवण्याचं कारणं नाही. पण ज्यांनी तो पाहिलायं, त्यांना या चित्रपटातील श्याम आणि त्याची आई हे दोन चेहरे विसरणं शक्य नाही.

अभिनेत्री वनमाला, दामू अण्णा जोशी, सुमती गुप्ते, बाबुराव पेंढारकर अशा मातब्बर कलाकारांच्या अभिनयानं सजलेला हा सिनेमा म्हणजे, एक महान कलाकृती. या चित्रपटाचा श्याम म्हणजे अभिनेते माधव वझे यांच्या निधनाने आज हा चिमुकला 'श्याम ' सर्वांना पोरका झाला त्यांना आमच्या सर्व मित्र परिवाराच्यावतीने भावपूर्ण आदरांजली.

**पद्माकर कुलकर्णी**
**सोलापूर**